## <u>*राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*</u>

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**
**<u>क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक – ६४७/२०२२/नाशिक</u>**

१ श्री. खान अखलाक अहमद : अपिलार्थी
रा. इरफान पॅलेस/१७०३, साकली स्ट्रीट,
भायखळा (प), मुंबई-४०००0८.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
उपकुलसचिव,
(परिक्षा विभाग), यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ,
नाशिक, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक,
ता.जि. नाशिक.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा, : प्रतिवादी
कुलसचिव,
यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक,
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक,
ता.जि. नाशिक.

**<u>सुनावणी दिनांक – १२/०१/२०२३</u>**

अपिलार्थी यांनी दि. १०/०१/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी मुद्दा क्र. १ ते ४ ची माहिती दिली परंतू मुद्दा क्र. ५ ची माहिती देण्यात आली नाही, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दि.१२/०१/२०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित-** अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी, तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी

**सुनावणीसाठी अनुपस्थित-** तत्कालीन जन माहिती अधिकारी (सेवानिवृत्त)

अपिलार्थी यांनी दि. ०८/०३/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठाच्या मालाड पुर्व केंद्रावरील सन २०१५ ते सन २०२० या कालावधीतील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठाच्या मालाड मुंबई येथील अल फलाह हाय स्कूल (३१३७७), हाजी बापू रोड, पोस्ट ऑफिसच्या मागे, मालाड (पुर्व), मुंबई ४०००९७, या केंद्रावरील २०१५ ते २०२० पर्यंत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी, बी.ए.पास झालेल्या विद्यार्थ्यांची यादी, मार्कशिट व सर्टिफिकेट घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी, कनव्हेकेशन घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी, मार्कशिट आणि सर्टिफिकेट व कनव्हेकेशन न घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी याबाबतची माहिती मिळण्याची विनंती केली होती. सदर माहिती अर्जाच्या

अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना दिनांक १०/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मालाड मुंबई येथील अल फलाह हायस्कूल (३१३७७), हाजी बापू रोड, पोस्ट ऑफिसच्या मागे, मलाड (पूर्व) मुंबई ४०००९७ या केंद्रावरील २०१५ ते २०२० प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी, सन २०१५ ते २०२० पर्यंत बी.ए. पास झालेल्या विद्यार्थ्यांची यादी, मार्कशीट व सर्टिफिकेट घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी, ही माहिती जोडली असुन सन २०१५ ते २०२० पर्यंत बी.ए. पास झालेल्या परंतू मार्कशिट व सर्टिफिकेट आणि कनव्होकेशन ज्यांनी घेतली नाही, त्या विद्यार्थ्यांची यादी याबाबतची माहिती विद्यापीठाकडे उपलब्ध नाही. सर्व मार्कशिट, प्रमाणपत्र विद्यापीठाच्या विभागीय केंद्राकडे अभ्यासकेंद्राकडे वितरीत करण्यासाठी सुपूर्द केली जातात, त्यामुळे कुठल्याही विद्यार्थ्यांने ते विद्यापीठाकडून घेतले नाही अशी स्थिती नाही, असे कळविले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी दि. ०२/०९/२०२१ च्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन दि. २२/०९/२०२१ रोजी, निर्णय पारित करुन अपिलार्थी यांना मुद्दा क्र. १ ते ४ ची माहिती प्राप्त झाली आहे असे त्यांनी सुनावनीवेळी सांगितले व मुद्दा क्र. ५ बाबत माहिती मिळण्याबाबत विनंती केले असुन जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र. ५ ची माहिती बाबत योग्य ती पुढील कार्यवाही करावी असे निर्देश देवून प्रथम अपिल निकाली काढले.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती बाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र. १ ते ४ ची माहिती पुरविली असुन मुद्दा क्र. ५ ची माहिती अभ्यास केंद्रा कडील असल्याने पुरविली नसल्याचे दिसुन येते. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी सेवानिवृत्त झाले आहेत. तसेच अपिलार्थी यांनी सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र. ५ ची माहिती गोपनीय स्वरुपाची असल्याचे कारण नमुद करुन पुरविली नाही.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक ०८/०३/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्र. १ ते ४ ची माहिती पुरविली असल्याचे दिसुन येते. मात्र मुद्दा क्र. ५ ची माहिती पुरविली नाही. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी सेवानिवृत्त झाले आहेत. सुनावणीवेळी अपिलार्थी यांनी मुद्दा क्र. ५ ची माहिती मिळण्याबाबत विनंती केली असल्याने आता या प्रकरणी अपिलार्थी यांना अद्यापही माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली मुद्दा क्र. ५ची कार्यालयात उपलब्ध असलेली व अभ्यास केंद्रा कडून प्राप्त करुन पुरविणे योग्य होईल.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, (परिक्षा विभाग), यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक

०८/०३/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात मुद्दा क्र. ५ची कार्यालयात उपलब्ध असलेली व अभ्यास केंद्रा कडून प्राप्त करुन नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी.

२) वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ६४७/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

१) कुलगुरू, यशवंत चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक-४२२२२२.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

**क्रमांक : रामाआ- नाशिक/द्वि.अ.क्र./६४७/२०२२/नाशिक ओ-** 233 **दिनांक-** 03/04/2023